'डब्ल्यूएफआय'कडून सूडभावना कशासाठी?

विनेशप्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयाने महासंघाला फटकारले

पीटीआय, नवी दिल्ली

आपल्या देशात मातृत्वाचा कायम गौरव केला जातो. त्यामुळे भारतीय कुस्तीगीर महासंघाने 'डब्ल्यूएफआय' सूडाच्या भावनेने काम करू नये, अशा कडक शब्दात दिल्ली उच्च न्यायालयाने शुक्रवारी ऑलिम्पियन कुस्तीगीर विनेश फोगटला पुनरागमनापासून रोखणाऱ्या 'डब्ल्यूएफआय'ला फटकारले.

तांत्रिक मुद्द्यांवर बोट ठेवत 'डब्ल्यूएफआय' ने विनेशला खेळण्यासाठी अपात्र ठरवले. त्यानंतर आशियाई क्रीडा स्पर्धांच्या निवड चाचणीत सहभागी होण्याबाबत १८ मे रोजी एकल न्यायाधीशांनी दिलेल्या आदेशात विनेशला दिलासा मिळाला नाही. या आदेशाला आव्हान दिल्यानंतर शुक्रवारी झालेल्या सुनावणीत मुख्य नायाधीश डी. के. उपाध्याय आणि न्यायमूर्ती तेजस कारिया यांच्या खंडपीठाने महासंघाच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढले.

अनुभवी खेळाडूना सहभागी होऊ देण्याच्या जुन्या पद्धतीमध्ये 'डब्ल्यूएफआय'ने केलेले बदल खूप काही सांगून जातात. बाळंतपणाच्या सुटीनंतर पुनरागमन करू इच्छणाऱ्या विनेशला आगामी आशियाई क्रीडा स्पर्धांच्या चाचणीत भाग घेऊ दिला जाईल याची खात्री करण्याची तसेच, अपरिहार्य कारणांसाठी पात्रता निकषांमध्ये शिथिलता आणता येते. त्यामुळे विनेशच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्यासाठी स्वतंत्र तज्ज्ञ समितीची नियुक्ती करण्याची तोंडी सूचना न्यायालयाने केली आहे.

आशियाई क्रीडा स्पर्धांच्या निवड चाचणीसाठी महासंघाकडून काढण्यात आलेल्या दोन परिपत्रकांवरून हे सर्व विनेशला रोखण्यासाठी केले जात असल्याचे वाटते. महासंघाची ही भूमिका योग्य नाही आणि खेळाच्या हिताची देखील नाही असेही निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे.

न्यायालयाकडून लवकरच आदेश

याचिकेवर दुपारच्या सत्रात पुन्हा सुनावणी सुरू झाल्यावर 'डब्ल्यूएफआय'कडून सोमवारपर्यंत हे प्रकरण पुढे ढकलण्याची आणि विनेशला महासंघाकडे अधिकृत अर्ज सादर करण्यास सांगण्याची विनंती न्यायालयाला केली. महासंघाच्या कार्यपद्धतीवर आधीच नाराजी व्यक्त करणाऱ्या खंडपीठाने महासंघाची ही विनंती फेटाळून लावली आणि विनेश आशियाई क्रीडा स्पर्धांच्या निवड चाचणीत भाग घेऊ शकते की नाही यावर स्वतः आदेश देऊ असे स्पष्ट केले.

निवड चाचणीचे चित्रीकरण

न्यायालयात युक्तिवाद करताना केंद्र सरकारकडून विनेशला निवड चाचणीत सहभागी करून घेण्यासाठी पात्रता निकषात शिथिलता दिली जाऊ शकते. पण, यासाठी 'डब्ल्यूएफआय'कडून निकषात सूट मिळणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. त्यावरेची निवड चाचणी 'डब्ल्यूएफआय'च्या तांत्रिक समितीच्या देखरेखीखाली आणि केंद्र सरकार तसेच भारतीय ऑलिम्पिक संघटनेने नियुक्त केलेल्या स्वतंत्र निरीक्षकांच्या उपस्थितीत घेत येतील आणि या संपूर्ण प्रक्रियेचे चित्रीकरण (व्हिडिओ रेकॉर्डिंग) केले जाईल, असे न्यायालयाला सुचविले.

पुनरागमनाचा निर्णय धोनीच्या हाती - सिमन्स

अहमदाबाद : इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) पुढील पर्वात खेळणार की नाही याचा निर्णय घेताना महेंद्रसिंह धोनी संघाच्या हिताचा विचार करेल, अशी प्रतिक्रिया चेन्नई सुपर किंग्जचे गोलंदाजी प्रशिक्षक एरिक सिमन्स यांनी व्यक्त केली.

'आयपीएल'ला सुरुवात झाल्यापासून संघात असूनही प्रथमच महेंद्रसिंह धोनी कधी सामन्यात खेळला नाही. पुढील पर्वाला सुरुवात होईल, तेव्हा धोनी ४५ वर्षांचा असेल. त्यामुळे धोनी स्वतःच त्याच्या पुनरागमनाचा निर्णय घेईल. पूर्णपणे तंदुरुस्त आणि संघासाठी योगदान देण्यास तयार असेल तरच धोनी पुनरागमनाचा विचार करेल. धोनीने केवा दुखापती अभावी एकही सामना खेळला नसला, तरी नेटभेटी त्याने सरावात प्रभाविक केले. "खरेच सांगतो. नेटमध्ये त्याने चेंडू चांगल्या पद्धतीने फटकावले. त्याला पायाची दुखापत होती आणि तो वेगाने धावू शकत नव्हता त्यामुळेच तो खेळला नाही. त्यामुळे त्याचा पुनरागमनाविषयी केवळ तोच सांगू शकतो," असे सिमन्स म्हणाले.

''धोनीने कधीही वैयक्तिक विक्रमांकडे लक्ष दिले नाही. त्याने कायम संघाचे हित बघितले. त्यामुळे त्याचा निर्णय हा वैयक्तिक उपलब्धींपेक्षा संघाच्या हिताचा अधिक असेल. पण, एक नक्की, की त्याला खेळताना पाहण्याचा आनंद वेगळाच असतो. तो संघात असणे आणि त्याचा शांत स्वभावाचा संघाला कायम फायदाच होतो,'' असेही सिमन्स यांनी सांगितले.

कारुआनाकडून प्रज्ञानंद पराभूत

बुखारेस्ट : भारतीय ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदला 'सुपर चेस क्लासिक'च्या सातव्या फेरीत अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनाकडून पराभूत व्हावे लागले. नेदरलँड्सच्या जॉर्डन व्हॅन फॉरेस्टला फ्रान्सच्या अलेरिझा फिरुझाच्या माघारीचा फायदा झाला, त्याच दिवशी उझबेकिस्तानच्या जावोखिर सिंदारोवने जर्मनीच्या व्हिन्सेन्ट केमेरर मात केले.

स्पर्धेच्या आता दोन फेऱ्या शिल्लक असून केमेर, फॉरेस्ट आणि कारुआना हे संयुक्तपणे ५.५ गुणांसह आघाडीवर आहेत. त्यांच्या मागे असलेल्या नेदरलँड्सच्या अनिश गिरीचे चार गुण आहेत. प्रज्ञानंद, अमेरिकेचा वेस्ली सो, फ्रान्सचा मॅक्सिम व्हॅचिएर-लाग्रेव आणि सिंदारोव यांचे ३.५ गुण आहेत. तर रोमानियाचा डेव बोगदान-डॅनिएल २.५ गुणांवर आहे. प्रज्ञानंदचा हा स्पर्धेतील पहिला पराभव ठरला.

पंजाबला मोठ्या फरकाने विजय गरजेचा

लखनऊ : सलग सहा सामने गमावणाऱ्या पंजाब किंग्जला 'प्ले-ऑफ'मध्ये स्थान मिळविण्यासाठी आपले आव्हान कायम राखावेच झाल्यास आज, शनिवारी होणाऱ्या 'आयपीएल' सामन्यात लखनऊ सुपर जायंट्ससविरुद्ध मोठ्या फरकाने विजय नोंदवावा लागेल.

पंजाबने आपले सुरुवातीचे सहा सामने जिंकले. मात्र, २५ एप्रिलला दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध २६५ धावांच्या विक्रमी लक्ष्याचा पाठलाग केल्यानंतर संघाची कामगिरी खालावली. गेल्या हंगामातील उपविजेता पंजाबचा संघ सुरुवातीच्या लयीकडे पाहता जेतेपदाचा प्रबळ दावेदार वाटत होता. मात्र, सलग सहा सामन्यांतील पराभवामुळे त्यांच्या 'प्ले-ऑफ'च्या आशाही धूसर दिसत आहेत. पाचव्या स्थानी असणाऱ्या पंजाबला आता लखनऊवर विजय मिळविण्यासह 'प्ले-ऑफ'मध्ये स्थान मिळविण्यासाठी रविवारी होणाऱ्या दोन सामन्यांच्या निकालावर अवलंबून राहावे लागेल.

- **वेळ :** सायं. ७.३० वा.
- **थेट प्रक्षेपण :** स्टार स्पोर्ट्स ९, ९ हिंदी, जिओहॉटस्टार ॲप.

रिझर्व्ह बँकेकडून विक्रमी लाभांश; केंद्राला २.८७ लाख कोटींचा दिलासा

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई : रिझर्व्ह बँकेने शुक्रवारी सरलेल्या २०२५-२६ आर्थिक वर्षासाठी केंद्र सरकारला २.८७ लाख कोटी रुपयांचा लाभांश हस्तांतरित करण्याला मंजुरी दिली. देशापुढे मोठी आर्थिक आव्हाने असताना, मध्यवर्ती बँकेकडून मंजूर आतापर्यंतचा सर्वाधिक लाभांश हा सरकारसाठी दिलासाच ठरेल.

गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या, रिझर्व्ह बँकेच्या केंद्रीय संचालक मंडळाच्या ६२३ व्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. गेल्या काही वर्षांत रिझर्व्ह बँकेकडून हस्तांतरित लाभांश सलगपणे वाढत आला आहे. मागील २०२४-२५ आर्थिक वर्षातही २.६९ लाख कोटी रुपयांचा विक्रमी लाभांश दिला गेला. ही रक्कम त्याआधीच्या कोटींच्या घरात वंदा गेला असून, त्यांच्याकडून वितरित लाभांश पाहता, सरकारी तिजोरीला लाभांशरूपी एकूण योगदान हे अर्थसंकल्पातील अंदाजापेक्षा खूप जास्त राहू शकेल.

रिझर्व्ह बँकेच्या एकूण उत्पन्नात मागील वर्षाच्या तुलनेत २६.४४ टक्के वाढ झाली, तर जोखीम तरतुदींपूर्वीची खर्चामध्ये २७.६ टक्के वाढ झाली आहे. बँकेचा ताळेबंद ३१ मार्च २०२६ रोजी २०.६१ टक्क्यांनी विस्तारून ९१,९७,१२१.०८ कोटी रुपयांवर पोहोचला आहे.

कोणत्याही आर्थिक वर्षासाठी हस्तांतरित करण्यायोग्य अतिरिक्त निधीची रक्कम, रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळाने मंजूर केलेल्या सुधारित आर्थिक भांडवल चौकटीच्या (ईसीएफ) आधारे निश्चित केली जाते.

चार वर्षांत योगदान ८.५६ लाख कोटींवर

वर्ष	लाभांश (रुपये)
२०२५-२६	२.८७ लाख कोटी
२०२४-२५	२.६९ लाख कोटी
२०२३-२४	२.१० लाख कोटी
२०२२-२३	८७,४९६ कोटी

वर्षात हस्तांतरित केलेल्या २.११ लाख कोटी रुपयांपेक्षा २७ टक्के अधिक होती.

फेब्रुवारीत मांडण्यात आलेल्या अर्थसंकल्पात, सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि वित्तीय संस्थांच्या लाभांशांसह, मध्यवर्ती बँकेकडून ३.१६ लाख कोटी रुपयांचे एकूण लाभांश हस्तांतरण अंदाजपत्रात धरले गेले. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा एकत्रित नफा जवळपास १ लाख कोटींच्या घरात राहिल्याने, केंद्राला लाभांश हस्तांतरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यास मदत झाली.

विप्रोकडून 'बायबॅक'साठी ५ जून पात्रता तारीख निश्चित

मुंबई : माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रणी कंपनी विप्रोने शुक्रवारी पूर्वघोषित समभाग पुनर्खरीदी (बायबॅक) योजनेसाठी ५ जून ही 'रेकॉर्ड तारीख' घोषित केली आहे. याचा अर्थ या तारखेला अथवा त्या आधी विप्रोचे भागधारक म्हणून नोंद असलेल्यांना या योजनेसाठी पात्र मानले जाईल. कंपनीने 'रेकॉर्ड तारखे'ची घोषणा केल्यानंतर शुक्रवारच्या सत्रात विप्रोचा समभाग १.६९ टक्क्यांनी वधारून २०३.११ रुपयांवर स्थिरावला. विप्रोच्या संचालक मंडळाने मंजूरी दिलेल्या समभाग पुनर्खरीदी योजनेनुसार, कंपनीकडून सुमारे ६० कोटी समभाग प्रत्येकी २५० रुपये किमतीला खरेदी केले जाणार आहेत. १६ एप्रिल रोजी, संचालक मंडळाने योजनेस मान्यता दिली. योजना जाहीर केल्यानंतर दिवशी असलेल्या प्रत्येकी २१० रुपये या समभाग किमतीच्या तुलनेत, २५० रुपये ही पुनर्खरीदी किंमत १९ टक्क्यांनी अधिक (अधिमूल्य) आहे.

बँक ऑफ इंडिया
नाव बँकेचा पलिकडचे

आंचलिक कार्यालय-विदर्भ अंचल,प्लॉट नं. 2072,दुसरा माळ,सुमती पॅलेस, महावीर उद्यान समोर रामनगर, वर्धा-442001 फोन 07152-245337, 245338 ई मेल : ard.vl.darbha@bankofindia.bank.in

सरफेसी ॲक्ट 2002 अंतर्गत स्थावर मालमत्तांची मेगा स्टार ई-लिलावाद्वारे विक्री सूचना

दि सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्टक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट रुल्स, 2002 च्या नियम 8(2) च्या तरतुदीसह वाचण्यात आलेल्या नियमांतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना याद्वारे सर्वसाधारण जनतेस विशेषतः खालील कर्जदारांना /सह-कर्जदारांना /जामीनदारांना सूचना देण्यात येते की, बँक ऑफ इंडियाकडे (सुरक्षित धनको) तारण असलेल्या तसेच बँक ऑफ इंडियाच्या प्राधिकृत अधिका-यांनी ज्याचा सांकेतिक आणि भौतिक ताबा घेतलेला आहे. अशा खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तांची विक्री "जे आहे जेथे आहे" तत्वावर, "जे काही आहे ते आहे" तत्वावर आणि "ज्या स्थितीत आहे तसे आहे" तत्वावर बँक ऑफ इंडियाकडे सुरक्षित मालमत्ता तारण ठेवून घेतलेल्या व खाली नमूद केलेल्या थकबाकीची संबंधित कर्जदार/जामीनदारांकडून वसुली करण्यात येणार आहे. आरक्षित किंमत आणि बयाणा रक्कम) ईएमडी (प्रत्येक सुरक्षित मालमत्तेसमोर दर्शविण्यात आली आहे. विक्री ही निम्नस्वाक्षरीकाराकडून ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे खाली नमूद केल्याप्रमाणे करण्यात येईल.

ई-लिलावाची तारीख आणि वेळ: 25/06/2026 सकाळी 11.00 ते सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत

(समाप्तीपूर्वी 10 मिनिटे आधी बोली सवर झाल्यास बोलीच्या मुदत वाढीच्या अटीसह)

(मालमत्तेच्या तपासणीसाठी विनंती **ARD.Vl.darbha@bankofindia.bank.in** या ई-मेल आयडीवर आणि /किंवा श्री शुभम मस्के मो. 8237771144, श्री स्वप्नील अग्रवाल मो.8888334383 यांच्याशी संपर्क साधून करता येईल.)

कर्जदार, सह-कर्जदार, प्रोपायटर गहाणदार, जमानतदाराचे नांव, शाखेचे नाव, मालमत्ता आयडी	संपत्तीचे विवरण	एकूण थकबाकी	ताबा प्रकार	नविन लिलावाची सुरुवातीची किंमत रु.	अनामत रक्कम (ईएमडी) रु.
कर्जदार/गहाणदार : श्रीमती अनिता अशोककुमार संचेती श्री अशोककुमार ज्ञानचंदजी संचेती BKIDHINGSANCHETI शाखा : हिंगणघाट	जागेचा सर्व भाग आणि तुकडा जागा आणि चालू बांधकाम असलेली (आर.सी.सी. स्ट्रक्चर्ड) दोन मजिल बिल्डींग मध्ये न्यू नंबुल प्लॉट नं.180/1, मौजा हिंगणघाट, म्लॉक नं.10, सिट नं.26, जेन मंदीर वार्ड, नगरपालिका घर नं.19, रामदेवबाबा मंदीराच्या मागे, हिंगणघाट, जि.वर्धा-442301 अंबाजे आराजी 287.30 चौ.मि. (3092 चौ.फीट) श्रीमती अनिता अशोककुमार संचेती आणि श्री अशोककुमार ज्ञानचंदजी संचेती (कर्जदार/गहाणदार) यांच्या नावाने.	रु. 26.71 लक्ष + मालमत्तेच्या तारखेपासून पुढीआय + इतर आनुषंगिक खर्च	सांकेतिक	रु. 1,36,91,000/-	रु. 13,69,100/-

ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे आहेत :

1) ई-लिलाव **"जे आहे जेथे आहे, आणि " जे काही आहे ते आहे आणि "ज्या स्थितीत आहे तसे आहे"** तत्वावर ऑनलाईन द्वारे होईल. इच्छुक बोलीदाराकडे ऑटो रिक्षाशी वैध नोंदणी पुढील प्रमाणेचे वैध व्यावसायिक परवाना (वास्तूक श्रेणी-ऑटो रिक्षाशी), वैध सार्वजनिक सेवा लिहा आणि वैध रहिवासी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

2) पुढील तपशिल, प्रक्रिया पूर्तता, अटी आणि शर्ती डाऊनलोड करुन घेण्यासाठी कृपया **https://bankofindia.bank.in** ला भेट द्या.
   a) ई-लिलाव सेवा पुरवठा दारायाच्या वेबसाईटचा पत्ता : **https://baanknet.com/.** बोलीदार हे **https://baanknet.com/** येथे भेट देऊ शकतात. जेथे बोलीदारांसाठी मार्गसूची उपलब्ध आहे. ई-लिलावात भाग घेण्यासाठी बोलीदारांनी खालील औपचारिकता आगाऊ पूर्ण करणे आवश्यक आहे.
   टप्पा - 1: बोलीदारांचेची नोंदणी बोलीदारांनी आपला मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडीसह ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर) लिंक वर देण्यात आलेली आहे. (नोंदणी करणे आवश्यक आहे.
   टप्पा - 2 : केवायसी पडताळणी- बोलीदारांनी आवश्यक केवायसी कागदपत्रे फक्त डिजीलॉकर अपलोड करावेत. केवायसी कागदपत्रांची पडताळणी डिजीलॉकर द्वारे केली जाईल.
   टप्पा - 3 : बीडर वॉलेटमध्ये ईएमडी रकमेचे हस्तांतरण : रकमेचे हस्तांतरण ऑनलाईन -ऑनलाईन ने एनईफटी/हस्तांतरण ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर जनरेट झालेल्या चलनद्वारे केले जाईल.
   टप्पा - 4 : बोली प्रक्रिया आणि बोली निकाल: इच्छुक बोलीदार टप्पा 1, 2 व 3 पूर्ण केल्यानंतर ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर ऑनलाईन बोली लावू शकतात. कृपया नोंद घ्या की, टप्पा 1 व पर्यंतची कार्यवाही ई-लिलाव तारखेपूर्वीच बोलीदार पूर्ण करावेत.
3) अधिकृत अधिका-यांच्या सर्वोत्तम ज्ञान आणि माहिती प्रमाणे, स्थावर मालमत्तांवर कोणताही ऋणभार नाही. तथापि, इच्छुक बोलीदारांनी लिलावासाठी ठेवलेल्या मालमत्तांवरील ऋणभार, नामनिर्देशन आणि दावे /अधिकार, देणी /मालमत्तेला होणारी बाधा याची स्वतंत्रपणे चौकशी, त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी करावी. ई-लिलावाची जाहिरात प्रसिध्द होणे म्हणजे कुणाविही वचनबध्दता असणे किंवा बँकेचे कोणत्याही प्रकारचे प्रतिनिधित्व करत असल्याचे समजण्यात येवू नये. मालमत्तांची विक्री बँकेला झाल असलेल्या आणि अद्याप असलेल्या सध्याचा आणि आगामी बोजासह /भारासह करण्यात येईल. विक्री करण्यात येणा-या मालमत्तांच्या संदर्भात ऑनलाईन बोली सवर करण्यात आल्यानंतर कोणत्याही स्वरुपाचा दाव्याचा विचार केला जाणार नाही.
4) बोलीदारांनी बोली सवर करण्यापूर्वी मालमत्तेच्या संदर्भात पाहणी करुन घेणे आवश्यक आहे. देण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार अंबंधित अधिकारी यांच्याशी संपर्क करुन मालमत्तेची पाहणी करता येईल. स्थावर मालमत्तांच्या पाहणीसाठी दिनांक : **08.06.2026 रोजी सकाळी 11.00 ते सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत** असून पाहणी करण्यासाठी संबंधित बँकेच्या शाखा प्रमुखांशी/संबंधित अधिकारी ज्याचा तपशील उपरोक्त देण्यात आलेला आहे. त्यानुसार संपर्क करुन पूर्वपरवानगी घेण्यात यावी.
5) बोली केवळ ऑनलाईन प्रक्रियेद्वारेच सादर करण्यात यावाव.
6) बोलीदारांनी लिलावाच्या सर्व अटी आणि शर्ती वाचल्या असून, त्यांना त्या मान्य असल्याचे समजण्यात येईल.
7) सादर करायची बोली रक्कम ही राखीव मूल्याच्या रकमेपेक्षा अधिक रकमेची असायी आणि बोलीदारांना आपली बोली रु.10,000/- (रु.दहा हजार मात्र) च्या पटीमध्ये वाढवता येईल.
8) यशस्वी बोलीदारांच्या बयाणा रक्कम (ईएमडी) ही विक्रीच्या रकमेचा भाग म्हणून जमा करुन घेण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदारांच्या बयाणा रकमेची (ईएमडी) परताव करण्यात येईल.
9) बँकांच्या प्रतिकालक ताब्यात असलेल्या मालमत्तेच्या बाबतीत जिल्हा दंडाधिकारी तर्फे /जिल्हा न्यायालया तर्फे भौतिक ताबा यशस्वी बोलीदारांना सुपूर्द केला जाईल.
10) बयाणा रक्कमेच्या (ईएमडी) ठेवीवर केवा बोलीमध्ये जमा केलेल्या कुठल्याही रकमेवर कुठल्याही प्रकारचा व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीदारांनी विक्रीच्या रकमेच्या 25% रक्कम, ज्याच्यामध्ये भरणा करण्यात आलेल्या बयाणा रक्कमेचा समावेश असून तावडतोब त्याच दिवशी किंवा काही कारणाशाठी कामकाजाच्या दुस-या दिवशी त्याचा भरणा करावा लागेल. खरेदी किंमत शिल्लक रक्कम विक्रीची स्वीकृती/पुष्टी केल्याच्या 15 दिवसांच्या आत जमा करणे आवश्यक आहे. ते करण्यास अपयशी ठरल्यास बँक यशस्वी बोलीदारांने जमा केलेली रक्कम जप्त करण्यास सवतंत्र आहे.
11) वेबसाईटवरील लिलावामध्ये सहभाग आणि बोली लावणे हे असे मानले जाईल की बोली लावना-याने लिलावाशी संबंधित अटी आणि शर्ती स्विकारल्या आहेत.
12) कोणत्याही प्रकारच्या इंटरनेट नेटवर्कची अडचण/वीजेचे जाणे किंवा अन्य कोणतेही तंत्रज्ञान अकार्यक्षम होणे यांस प्राधिकृत अधिकारी /बँक किंवा ई-सेवा पुरवठादार जबाबदार राहणार नाहीत. असे प्रसंग होऊ नये यासाठी इच्छुक बोलीदारांना विनंती करण्यात येत आहे कि त्यांनी तांत्रिकदृष्ट्या सक्षम असावे आणि योग्य असा पॉवर बँकअप त्यांच्याकडे असावा.
13) यशस्वी बोलीदारांच्या द्वारे निश्चित झालेला विक्री रकमेचा भरणा बँकेकडे करण्यापूर्वी यशस्वी बोलीदाराकडून आयकर कायदा 1961 च्या कलम 194-1 ए च्या अंतर्गत आणि टीडीएस च्या भरणा, बोली रकमेच्या उर्वरित 75% टक्के रकमेचा भरणा करताना करणे गरजेचे आहे. यशस्वी खरेदीदारा लागू असणारे मुद्रांक शुल्क, नोंदणीकरण शुल्क, अन्य प्रासंगित शुल्क, संबंधानिक शुल्क आणि असंबंधानिक शुल्क किंवा देणी इत्यादीचा भरणा करावा लागेल.
14) कोणतेही कारण न देता, कोणत्याही टप्पावर ई-लिलावातील कोणतेही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारणे किंवा नाकारणे किंवा ई-लिलाव तहकूब करणे /पुढे ढकलणे/ रदद करणेचा किंवा लिलाव प्रक्रियेतून कोणतीही मालमत्ता मागे घेणे याचा संपूर्ण अधिकार प्राधिकृत अधिकारी/बँकेकडे असेल. उपरोक्त परिशिष्टात नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तांचा तपशील प्राधिकृत अधिका-याहितीनुसार असून यामधील कोणतीही चूक, चुकीचे विधान किंवा त्रुटी याला प्राधिकृत अधिकारी उत्तरदायी नसतील.
15) विक्रीचे प्रमाणपत्र हे केवळ खरेदीदाराच्या/अर्जदाराच्या नावे जारी करण्यात येईल व ते अन्य कोणाच्याही नावे करण्यात येणार नाही.
16) दि सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेटस ॲन्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 अंतर्गत विहित करण्यात आलेल्या नियम,शर्तीच्या आधारे विक्री करण्यात येईल. विक्रीच्या संदर्भात अधिक माहिती /चौकशी जर असल्यास त्यासंबंधी माहिती संबंधित शाखांना संपर्क साधून प्राप्त करता येईल.
17) एकदा केलेली बोली मागे घेतली जाणार नाही किंवा रदद् केली जाणार नाही. वापरकर्त्याच्या नोंदणीकृत आयडीवरुन केलेल्या सर्व बिड त्याने/तिचेच केल्या आहेत असे मानले जाईल.
18) ही सूचना कर्जदार, सह-कर्जदार,जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला देखील लागू आहे.

कर्जदार/जामीनदारांना विक्री सूचना

ही नोटीस सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल 2002, च्या नियम 8(2) अंतर्गत कर्जदार/जामीनदारांना (एल/आर.एस.) हयांनी सदर सूचना त्यांना देण्यात आलेली 30 दिवसांची सँवैधानिक विक्री सूचना म्हणून समजण्यात यावी.

माननीय महोदय/महोदया,

निम्न स्वाक्षरीकार हे बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी असून सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेटस आणि एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 आणि त्या अंतर्गत स्थावर करण्यात आलेल्या नियमानुसार त्यांना ही सूचना जारी करण्याचे आणि विक्रीचे अधिकार देण्यात आले आहेत. उपरोक्त नमूद केलेल्या कर्जदार/जामीनदार यांनी त्यांच्या नावे असलेल्या मालमत्तेच्या संदर्भात खाली नमूद केलेल्या थकबाकीच्या रकमेचा भरणा करण्यास असमर्थ ठरले आहात म्हणून बँकेने तुमच्याकडे नमूद रकमेचा भरणा 60 दिवसांमध्ये करण्यासाठी कलम 13(2) (अंतर्गत मागणी सूचना जारी करण्यात आली होती. तुम्ही 60 दिवसांच्या मुदतीनंतरही रकमेचा भरणा करू शकला नाहीत म्हणून प्राधिकृत अधिका-यांना कलम 13(4) च्या अंतर्गत प्रदान आलेल्या अधिकारांचा वापर करुन त्यांनी उपरोक्त परिशिष्ट मध्ये देण्यात आलेल्या सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे. याद्वारे तुम्हास सूचना देण्यात येते कि, विक्रीसाठी निश्चित करण्यात आलेल्या दिनांकाच्या पूर्वी उपरोक्त नमूद केलेल्या रकमेचा भरणा करावा आणि जर असे न झालयास मालमत्तेची विक्री करण्यात येईल आणि जर काही शिल्लक असल्यास तुमच्याकडून व्याज आणि खर्चासह वसूल करण्यात येईल. कृपया नोंद घेण्यात यावी की, मागणी सूचना, ताबा घेणे, मालमत्तेचे मुल्यांकन आणि विक्री यासाठी झालेला सर्व खर्च प्राधिकृत अधिका-याकडून कळवण्यात येईल आणि प्रथम तो वसा करण्यात येईल आणि विक्री प्रक्रियेतील उर्वरित योग्य भाग उपरोक्त नमूद तुमच्या लागू असणा-या देण्यासाठी वापरण्यात येईल. अटी आणि शर्ती यावर आधारित असलेल्या लिलावामध्ये तुम्ही आवश्यक वा बयाणा) ईएमडी (रक्कमेचा भरणा करून सहभागी होऊ शकता.

ठिकाण : वर्धा
दिनांक : 23.05.2026

(कोणत्याही विसंगतीच्या बाबतीत सदर सुचनेची इंग्रजी आवृत्ती अस्सल व ग्राह्य मानली जाईल)

प्राधिकृत अधिकारी
बँक ऑफ इंडिया

बँक ऑफ बड़ौदा
Bank of Baroda

शाखा - एसएआरबी अमरावती
C/O M.I.D.C. शाखा प्लॉट क्रमांक 39 सुर्या, फत्रही स्टॉप रोड, दस्तूर नगर, अमरावती (महा.), 444606

प्रत्यक्ष ताबा सूचना
(सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम 8 (1))

ज्याअर्थी, सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फाइनँशियल ॲसेट्स ॲन्ड ईन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऐक्ट 2002 (दुसरा)(सरफेसी) च्या अंतर्गत खालील हस्ताक्षरकर्ता हे बँक ऑफ बड़ौदा चे अधिकृत अधिकारी आहे, तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (ईन्फोर्समेंट) रुल्स 2002 चे नियम 13(12) च्या सोबतच वाचला जाणारे रुल 9 च्या अंतर्गत **कर्जदार श्री. अंकित ब्रिक्स, मालक - श्री. राजेश वासुदेव चौरसिया आणि श्री. शैलेश वासुदेव चौरसिया (जामीनदार तसा गहाणदार)** यांना **डिमांड नोटिस दिनांक 10/7/2014** ला देऊन सूचनेत दर्शविलेली रक्कम **रु. 55,99,436/- (रुपये पंचावन्न लाख नव्वाण्णव हजार चारशे छत्तीस फक्त) + मागणी सूचनेत नमूद केलेले न आकारलेले व्याज + व्याज उलटपरेट + इतर शुल्क.** ही सूचना प्राप्तीनंतर 60 दिवसांचा आत भरपाई करण्याच्या उद्देशाने इसारा मध्ये दर्शविलेल्या तारखेला दिली होती.

संपूर्ण रक्कमेची भरपाई करण्याकरीता कर्जदार असमर्थ सिध्द ठरल्यामुळे तसेच आम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, खालील दिलेल्या उप-कलम 13(4) सह वाचला जाणाऱ्या अंक रूल 9 च्या अंतर्गत हस्ताक्षरकर्ताने दिलेल्या संपत्तीचा **प्रत्यक्ष ताबा रु. 22 मे 2026** ला घेतला आहे.

विशेष करून कर्जदार तसेच आम जनतेला या व्दारा वरील संपत्तीच्या विषयी काहीही घेणे देणे न करण्याकरीता जागृत केले जात आहे. तसेच पुढील संपत्तीचे व रकमेवरील व्याजाचे व इतर अधिभार सहित **बँक ऑफ बड़ौदा चे रु. 55,99,436/- (रुपये पंचावन्न लाख नव्वाण्णव हजार चारशे छत्तीस फक्त) + मागणी सूचनेत नमूद केलेले न आकारलेले व्याज + व्याज उलटपरेट + इतर शुल्क.**

अचल संपत्तीचे विवरण

खालील मालमत्तेचे नॉटींगहाम गहाणदात: मौजे बेनोदा, परगणे बाइनेरा, तालुका व जिल्हा अमरावती येथील, सर्वेक्षण क्रमांक 43 च्या मंजूर व रुपांतरित लेआउटमधील भूखंड क्रमांक 18 आणि 19 वर संयुक्तपणे वसलेल्या संत गजानन कॉम्प्लेक्स (Sant Gajanan Complex) मधील अ आणि ब इमारतीमधील दुकाने, दुकानाचे क्रमांक: 100-अ (क्षेत्रफळ 123.50 चौरस फूट), तळमजल्यावर स्थित.

चतुर्दिशा खालीलप्रमाणे : पूर्वेस - मोकळी जागा व ली विंग, पश्चिमेस - मोकळी जागा व मुख्य बायपास रोड, उत्तरेस - मोकळी जागा न प्रवेश रस्ता, दक्षिणेस - दुकान क्र. 101-अ इमारत अ मधील पहिल्या मजल्यावरील दुकान क्र. 204-अ (क्षेत्रफळ 206.56 चौ. फूट). इमारत अ मधील पहिल्या मजल्यावरील दुकान क्र. 205-अ (क्षेत्रफळ 212.16 चौ. फूट). इमारत अ मधील पहिल्या मजल्यावरील दुकान क्र. 206-अ (क्षेत्रफळ 224.25 चौ. फूट).

सामाईक चतुर्दिशा :- पूर्वेस - मोकळी जागा व ली विंग, पश्चिमेस - मुख्य प्रवेशद्वार व मुख्य बायपास रोड, उत्तरेस - दुकान क्र. 203/अ, दक्षिणेस - मोकळी जागा व कंपाउंड भिंत इमारत बी मधील पहिल्या मजल्यावरील दुकान क्र. 407-ब (क्षेत्रफळ 484.49 चौ. फूट).इमारत बी मधील पहिल्या मजल्यावरील दुकान क्र. 408-ब (क्षेत्रफळ 497.40 चौ. फूट).

सामाईक चतुर्दिशा :- पूर्व-मोकळ